CMYK

एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी कामाच्या मंजुरीची प्रत संजय रायमुलकर यांना दिली >> पान 2

बालविवाह होऊच नयेत, यासाठी मुला-मुलींच्या समुपदेशनावर भर द्या - राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर >> पान 3

ढाणकी नगरपंचायतचा अवास्तव संकल्प कर रद्द करा >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



लग्नाच्या ६ दिवसानंतर कामावर परतली कीर्ती सुरेश
आतील पान

**सुविचार**
जीवनातील प्रत्येक दिवस नवीन संधी घेऊन येतो.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 130 ■ शनिवार, दि. 21 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# बीडमधील गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढणार, दोषींवर मकोका अंतर्गत कारवाई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**बीड घटनेची न्यायालयीन तसेच, एसआयटीमार्फत दुहेरी चौकशी, पोलीस अधिक्षकांची बदली**

**परभणीतील घटनेची न्यायालयीन चौकशी होणार; पोलीस अधिकारी निलंबित**

**बीड, परभणीतील मृतांच्या कुटुंबियांना दहा लाखांची मदत**

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : बीड, परभणी मधील घटना दुर्दैवी आहेत. या दोन्ही घटनांची सरकारने गंभीर दखल घेतली असून बीड जिल्ह्यातील हत्येच्या प्रकरणाची न्यायालयीन आणि एसआयटी अशी दुहेरी चौकशी केली जाईल. तर परभणी मधील संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली.**

बीड, परभणी घटनांमधील दोन्ही मृतांच्या कुटुंबियांना दहा लाख रुपयांची आर्थिक मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. त्यानुसार बीड मध्ये हत्या झालेल्या सरपंच संतोष देशमुख आणि परभणी मधील घटनाक्रमात मृत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना ही दहा लाखांची मदत देण्यात येणार आहे.

बीड मधील प्रकरणाची न्यायालयीन व एसआयटी मार्फत चौकशी करण्याबरोबर जिल्हा पोलीस अधिक्षकांची बदली करण्यात येईल. या प्रकरणातील दोषींवर मकोका अंतर्गत कारवाई करून बीड जिल्ह्यातील भूमाफिया, वाळूमाफियांसह इतर प्रकारच्या गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढू, अशी स्पष्ट भूमिकाही मुख्यमंत्री



श्री. फडणवीस यांनी विधानसभेत मांडली. परभणीत पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून त्यांनी वाजवी पेक्षा अधिक पोलीस बळाचा वापर केला आहे काय, याची चौकशी केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

बीड, परभणी येथील घटनेसंदर्भात विधानसभेत झालेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, परभणी जिल्ह्यातील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. भारताच्या संविधानाचा अपमान हा सर्व भारतीयांचा अपमान आहे. त्यामुळे हा अपमान सहन केला जाणार नाही. परभणी येथील कृत्य एका मनोरूग्णाने केले आहे. तो मनोरुग्ण असल्याचा स्पष्ट वैद्यकीय अहवालही उपलब्ध आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत



सर्व राजकीय पक्षांनी तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. या प्रकरणात कोंबिंग ऑपरेशन झाले नाही. परभणीत सकल हिंदू समाजाचा मोर्चा हा सर्वपक्षीय होता. या मोर्चात बांग्लादेशमधील हिंदूंसंदर्भात मागणी करण्यात आली होती. त्यामुळे ही हिंदू विरूद्ध दलित अशी दंगल नाही. परभणीत झालेल्या तोडफोडीत दुकाने, वाहने, सरकारी कार्यालयांचे नुकसान झाले आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बीड येथील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मोहीम हाती घेणार असून चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. बीडमध्ये आवाडा ग्रीन एनर्जी कंपनीने गुंतवणूक केली आहे. या कंपनीची कामे आम्हालाच द्या किंवा खंडणी द्या अशी मानसिकता काहींची तयार झाली आहे. त्यामुळे बीड प्रकरणातील मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. या प्रकरणात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असणाऱ्यांवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल. बीड जिल्ह्यातील पोलीसांनी देखील योग्य कारवाई करावी. गुन्हे दाखल करताना वस्तुस्थिती तपासावी, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

## ताम्हिणी घाट बस दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबाला पाच लाखांची मदत; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** ताम्हिणी घाटातील बस दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी विधानसभेत सांगितले. पुणे येथून महाडकडे जाणाऱ्या बसला ताम्हिणी घाटात अपघात झाला. ही दुर्घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

## विधानपरिषदेत सन २०२४-२५ वर्षाच्या पुरवणी मागण्या मंजूर; पुरवणी मागण्यांवरील मुद्यांना मंत्र्यांच्या माध्यमातून लेखी उत्तर देणार- उपमुख्यमंत्री पवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विविध विभागाच्या २०२४-२५ या वर्षासाठीच्या पुरवणी मागण्यांना विधानपरिषदेत मंजुरी देण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देतांना सांगितले की, संबंधित विभागांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सभागृहातील सदस्यांनी सहभाग घेतला. या सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना संबंधित मंत्र्यांच्या माध्यमातून लेखी उत्तरे दिली जातील. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची शहानिशा करुन त्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले.

## रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या खात्यात २ हजार ८५६ कोटी रुपये जमा

दैनिक आपला विदर्भ


**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या बँक खात्यामध्ये सन २०२४- २५ मध्ये २ हजार ८५६.३० कोटी रुपयांचा निधी जमा करण्यात आल्याची माहिती रोजगार हमी योजना विभागाकडून देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत १०० दिवसांपर्यंतची मजुरी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधून दिली जाते. तर १०० दिवसांच्या वरील मजुरी राज्या शासनाच्या निधीतून दिली जाते. त्यानुसार सन २०२४-२५ मध्ये १०० दिवसांपर्यंत मजुरीचे २ हजार ६१६.३० कोटी निधी आणि १०० दिवसांवरील मजुरीचे २४० कोटी रुपये असा एकूण २ हजार ८५६.३० कोटी निधी मजुरांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आला आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून सन २०२४-२५ मध्ये अनुक्रमे ६६.२१ कोटी व ५.८८ कोटी रुपये असा एकूण ७२.०९ कोटी इतका निधी मजुरीपोटी पालघर जिल्ह्यातील मजुरांच्या खात्यात जमा करण्यात आला असल्याची महितीही 'रोहयो' विभागाने दिली आहे.

## कायदा हा केवळ पतींना शिक्षा देण्यासाठी नाही; लग्नाबाबत सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे भाष्य

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने लग्नाबाबत महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की विवाह हा व्यावसायिक उपक्रम नाही आणि कायद्यातील तरतुदी महिलांच्या कल्याणासाठी आहेत आणि त्यांच्या पतीला शिक्षा करण्यासाठी नाहीत. एका खटल्याच्या



सुनावणीदरम्यान न्यायालयाने ही टिप्पणी केली. न्यायमूर्ती बीव्ही नागरथना आणि न्यायमूर्ती पंकज मिथल यांच्या खंडपीठाने सांगितले की, हिंदू विवाह ही एक पवित्र प्रथा आहे. हा कुटुंबाचा पाया आहे. हा व्यावसायिक उपक्रम नाही.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, महिलांनी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे की त्यांच्या हातात असलेल्या कायद्याच्या या कठोर तरतुदी त्यांच्या कल्याणासाठी आहेत आणि त्यांच्या पतींना शिक्षा, धमकावणे, वर्चस्व किंवा पिळवणूक करण्यासाठी नाही. फौजदारी कायद्यातील तरतुदी महिलांच्या संरक्षण आणि सक्षमीकरणासाठी आहेत, परंतु काही वेळा काही महिला त्याचा गैरवापर करतात. ज्या हेतूंसाठी ते कधीही अस्तित्वात नव्हते. न्यायमूर्ती बीव्ही नागरथना आणि न्यायमूर्ती पंकज मिथल यांच्या खंडपीठाने विभक्त राहणाऱ्या जोडप्याचे लग्न रद्द करताना ही टिप्पणी केली. या प्रकरणात पतीला एका महिन्याच्या आत त्याच्या विभक्त पत्नीला पोटगी म्हणून १२ कोटी रुपये देण्याचे आदेश देण्यात आले होते. हे नाते पूर्णपणे तुटल्याचे खंडपीठाने म्हटले आहे. त्यामुळे लग्न मोडण्याचे आदेश दिले. तथापि, काही स्त्रिया, गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन, कायद्याचा गैरवापर करतात आणि त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी पती आणि त्यांच्या कुटुंबीयांवर दबाव आणतात अशा प्रकरणांवर न्यायालयाने चिंता व्यक्त केली.

## संजय राऊत यांच्या घराबाहेर अज्ञातांकडून रेकी!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरेंच्या पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्या मुंबईतील घराची रेकी करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संजय राऊत यांच्या भांडुपमधील मैत्री बंगल्याच्या बाहेर दोन अज्ञातांकडून रेकी करण्यात आली. सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास हे दोन अज्ञात व्यक्ती संजय राऊत यांच्या घराबाहेर रेकी करत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून या प्रकाराबाबत पोलीस चौकशी करत आहेत. या घटनेनंतर संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे, तर दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या प्रकरणी लक्ष





घालण्याबाबत त्यांनी सांगितलं.

आज देवेंद्र फडणवीस यांना भेटलो. आज संजय राऊत घराची रेकी झाली. त्यांच्या घराची रेकी झाली असल्याची माहिती समोर आली आहे. दोन अज्ञात लोक बाईक वर आले, राऊत यांच्या दिल्लीच्या घराची सुद्धा रेकी झाली आहे. आज मुख्यमंत्री यांना मागणी केली आहे की, हे लोक कोण आहेत याचा तपास करावा. संजय राऊत यांची सुरक्षा वाढवावी अशी मागणी केली आहे. संजय राऊत यांच्या जीवाला धोका आहे त्यावर उपयोजना केल्या पाहिजे, असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

सुरक्षा देणं घेणं किंवा काढणं याबाबतचे राजकीय निर्णय कधीकधी होत असतात. गेल्या अडीच वर्षात सुडाचं राजकारण झालं, नको त्यांना सुरक्षा दिली गेली. पाहिजे त्यांची सुरक्षा काढली गेली. पण मला त्याच्यात जायचं नाही. काल आपण जे पाहिलं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बोलण्यामध्ये होतं, सुडाचं राजकारण करणार नाही. राज्याला एकत्र येऊन पुढे चालणार. विरोधी किंवा त्यांच्यासोबतचे नेते असतील भेदभाव होणार नाही. आज देखील त्यांनी बीडवरती उत्तर दिलेलं आहे.

### विधानसभेत विरोधकांच्या आसनांवर बाबासाहेबांची प्रतिमा
## सत्ताधाऱ्यांसोबत खडाजंगी

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याचे पडसाद आज राज्याच्या विधानसभेत उमटले. विरोधकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो आपल्या आसनावर ठेवला. या कृतीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृह १० मिनिटांसाठी तहकूब केले.

दिल्लीत संसदेच्या प्रांगणात भाजप-काँग्रेसचे खासदार आमनेसामने आले होते. त्यानंतर सायंकाळी मुंबईत भाजपच्या कार्यकर्त्यांनी मुंबई काँग्रेसच्या ऑफिसवर हल्ला करत तोडफोड केली. त्याशिवाय, काँग्रेस नेत्यांच्या फोटोवर शाई फेक केली. या सगळ्या घडामोडींचे पडसाद आज विधानसभेत उमटले. काँग्रेसचे नेते विजय



वडेट्टीवार यांनी मुंबई काँग्रेस कार्यालयावरील हल्ल्याचा मुद्दा उपस्थित करत पोलिसांवर प्रश्न उपस्थित केला. यावेळी विरोधकांच्या बाकांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो होता.

त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांना उद्देशून म्हटले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आमचा ही हक्क आहे. बाबासाहेब आंबेडकर फक्त तुमचेच आहेत का? तुम्ही बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो लावत आहात.आमच्याही बाकावर फोटो लावा, असे आवाहन केले.

त्यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटले की, मी सभागृहात फोटो लावण्यास परवानगी दिली नाही. नियमानुसार काम केले पाहिजे.सभागृहात अडचण होईल असे काम करू नये. तुम्ही बाबासाहेबांची प्रतिमा ठेवल्याने मला तुमचे चेहरे दिसत नाही. त्यामुळे कामकाज करणे कठीण होईल असे नार्वेकर यांनी सांगितले.

विधानसभा अध्यक्षांच्या या आवाहनानंतर भाजप आमदार रणधीर सावरकर यांनीदेखील बाबासाहेबांचे फोटो लावण्यासाठीची परवानगी मागितली. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो काढण्यावरून विरोधक आणि सत्ताधारी यांची शाब्दिक बाचाबाची झाली. सत्ताधारी आमदार अध्यक्षांसमोरील मोकळ्या जागेत उतरल्याने सभागृहाचे कामकाज काही मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले.

## ताम्हिणी घाटात भीषण अपघात; बस दरीत कोसळून ५ जण ठार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ताम्हिणी घाटाजवळ एका धोकादायक वळणावर बसला भीषण अपघात झाला आहे. बस दरीत कोसळून पाच जण ठार झाल्याची माहिती मिळत आहे. तर, १२ ते १३ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. चाकण इथून महाडला लग्नासाठी जात असताना आज सकाळच्या सुमारास अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. बसमध्ये ४० च्या आसपास प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

ताम्हिणी घाटातील वॉटरफॉल पॉईंटजवळ भीषण अपघात घडल्याची घटना उघडकीस आली आहे. एका प्रवासी ट्रॅव्हल्सचा ताबा सुटल्यानं ती पलटी झाली असून या दुर्घटनेत पाच जण जागीच ठार झाल्याची माहिती मिळत आहे. तसेच, अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. ही ट्रॅव्हल्स चाकणवरून वीरवाडीला (महाड), लग्नाला चालली होती. पाच जण जागीच ठार झाले असून तीन महिला आणि दोन पुरूषांचे मृतदेह बाहेर काढल्याची माहिती मिळत आहे. अपघातस्थळी बचावकार्य सुरू असून अनेकजण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, मृतांची संख्या वाढण्याची भितीही व्यक्त केली जात आहे.

अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. ट्रॅव्हल्समध्ये अडकलेल्या



अनेकांना बाहेर काढण्यात आलं.

पुण्यावरून रायगड दिशेकडे येत असताना तीव्र उतारावर अंदाज न आल्यानं अपघात घडला. अपघातात एकूण ४५ प्रवाशी प्रवास करत होते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. २५ हून अधिक प्रवासी जखमी असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. अपघात स्थळी माणगावमधील रुग्णवाहिकांनी जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रायगडच्या ताम्हिणी घाटात एका खासगी बसचा अपघात झाला. या अपघातात बसमधील काही प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळते. पुण्यावरून रायगडच्या दिशेकडे येत असताना ताम्हिणी घाटातील तीव्र वळणावर ही बस कलंडली आणि अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. एकूण ४५ प्रवासी बसमधून प्रवास करत होते. त्यामधील बरेचसे प्रवासी जखमी असल्याची माहिती मिळतेय. काही प्रवासी बसखाली अडकून पडल्यानं त्यांना बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

CMYK

# एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी कामाच्या मंजुरीची प्रत संजय रायमुलकर यांना दिली

## मेहकर बसस्थानक कॉंक्रीटीकरणासाठी ४ कोटी २२ लाख रुपये संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून मंजूर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :**माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून तीन कोटी २५ लाख रुपये खर्चाच्या मेहकर बस स्थानकाचे काम जवळपास पूर्ण झाले असून आता त्यांच्याच प्रयत्नातून बस स्थानक परिसराच्या कॉंक्रिटीकरणासाठी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी ४ कोटी २२ लाख ५० हजार रुपये मंजूर केले असून त्यांनी आदेशाची प्रत काल ता.१९ रोजी नागपूर येथे संजय रायमुलकर यांना दिली.

मेहकर बस स्थानकाचे काम पूर्ण होण्याआधीच एक वर्षापासून माजी आमदार संजय रायमुलकर यांनी त्यांच्या कार्यकाळात बस स्थानकाच्या



कॉंक्रिटीकरणास निधी मिळण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. सदर कामास आता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून त्यासाठीच्या चार कोटी २२ लाख ५० हजार रुपये निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे .सदर आदेशाची प्रत नागपूर येथे विधिमंडळ अधिवेशनादरम्यान एस टी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी संजय रायमुलकर यांना काल दिली.

वाहनतळाचे कॉंक्रिटीकरण करणे ,सांडपाण्याचे व्यवस्थापन आणि रेनवॉटर हार्वेस्टिंग ची व्यवस्था करणे यासाठी सदर निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया लवकरच पार पडणार असून त्यानंतर सदर कामास सुरुवात करण्यात येणार आहे. कार्यकारी अभियंता स्थापत्य अभियांत्रिकी विभाग अमरावती यांच्याकडून आता पुढील प्रक्रिया पार पडणार आहे. नव्या बसस्थानकाचे लोकार्पण लवकर व्हावे म्हणून कॉंक्रिटीकरणाचे काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना संजय रायमुलकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

मेहकर एस टी आगाराची इमारत नव्याने बांधण्याचा प्रस्तावही माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून अंतिम मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. आगार कार्यालय इमारत, कार्यशाळा शेड, दुरुस्ती रॅम्प, वाहन परीक्षक खोली परिसराचे कॉंक्रिटीकरण आदींसाठी १४ कोटी रुपयांचा प्रस्ताव देण्यात आला आहे.

## चटका लावून जाणारी निवृत्ती

भारताचा अव्वल ऑफ स्पिनर रविचंद्रन आश्विन याने ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या तिसऱ्या कसोटी नंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट मधून निवृत्तीची घोषणा केली. रविचंद्रन आश्रि्वन याच्या निवृत्तीच्या घोषणेने क्रिकेट रसिकांना धक्का बसला कारण त्याची निवृत्ती अनपेक्षित होती. आश्विन असा काही निर्णय घेईल असे कोणालाच वाटले नव्हते कारण त्याच्यात अद्याप बरेचसे क्रिकेट शिल्लक होते. जरी तो आज ३८ वर्षाचा असला तरी तरी तो फिट आणि फॉर्मात होता. सहा महिन्यांपूर्वीच इंग्लंड विरुद्धच्या राजकोट कसोटीत त्याने ५०० बळींचा टप्पा गाठत विक्रमी कामगिरी केली होती. कसोटी क्रिकेटमध्ये पाचशे बळी घेणारे मोजकेच गोलंदाज आहेत त्यात आश्विनचा समावेश झाला होता. भारताच्या दृष्टीने पाहायला गेले तर कसोटीत पाचशे बळी मिळवणारा तो भारताचा दुसराच गोलंदाज आहे. या आधी अशी कामगिरी भारताचा महान लेगस्पिनर अनिल कुंबळे यालाच करता आली आहे. आश्विनने ५३७ कसोटी बळी घेतले आहेत आणि त्याच्यापुढे फक्त अनिल कुंबळे होता, अनिल कुंबळे याने कसोटीत ६१९ बळी घेतले आहेत, याचाच अर्थ दोघांमध्ये आता फक्त ८२ बळींचे अंतर होते. आश्विन आता ३८ वर्षाचा आहे. त्याचा फॉर्म आणि फिटनेस उत्तम आहे त्यामुळे तो आणखी एक दीड वर्ष सहज खेळू शकला असता. तो जर आणखी एक दीड वर्ष खेळला तर तो अनिल कुंबलेला मागे टाकून भारताकडून सर्वाधिक बळी मिळवणारा गोलंदाज ठरला असता. मात्र त्याने त्याची वाट न पाहता निवृत्ती घोषित केली त्यामुळेच त्याची निवृत्ती क्रिकेट रसिकांना चटका लावून गेली. अर्थात त्याच्या या कृतीतून त्याच्या विषयीचा आदर आणखीन वाढला. आपण विक्रमासाठी नाही तर देशासाठी खेळलो हे त्याने कृतीतून सिद्ध केले. रविचंद्रन आश्विन हा जगातील सर्वाधिक धोकादायक गोलंदाज समजला जात असे. विशेषतः भारतीय खेळपट्ट्यांवर तर तो अधिक धोकेदायक ठरत असे. त्याने मिळवलेल्या ५३७ बळीपैकी ३८३ बळी त्याने भारतात घेतल्या आहेत. परदेशातही त्याची कामगिरी चांगली आहे. परदेशातही त्याने बळी मिळवलेले आहेत. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध त्याने सातत्याने चांगली गोलंदाजी केली आहे. मागील दशकभरात भारताने कसोटीत जे वर्चस्व गाजवले त्यामागे आश्विन हे एक महत्वाचे कारण आहे. आश्रि्वनने केवळ कसोटीतच नाही तर एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही चमकदार कामगिरी केली. एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने खूप बळी मिळवले आहे. कसोटी प्रमाणेच एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. आश्विन हा भारताचा खराखुरा मॅच विनर खेळाडू आहे. २०११ साली जेंव्हा त्याने भारताकडून कसोटीत पदार्पण केले तेंव्हा अनिल कुंबळे निवृत्त झाला होता तर हरभजन सिंगचा उतरता काळ सुरू झाला होता. या दोघांनी जवळपास दीड दशके भारतीय फिरकी गोलंदाजीची धुरा सांभाळली होती. त्यांच्यानंतर भारतीय फिरकीची धुरा कोण सांभाळणार हा प्रश्न होता. कारण त्यावेळी त्यांची जागा घेणारा तर सोडाच पण त्यांच्या जवळपास जाऊ शकणारा एकही फिरकी गोलंदाज दिसत नव्हता. आश्विन ज्यावेळी आला त्यावेळीही तो इतकी मोठी मजल मारेल असे भाकीत कोणी केले नव्हते मात्र त्याने मिळालेल्या संधीचे सोने केले आणि भारताला अनेक अप्रतिम विजय मिळवून दिले. त्यामुळेच तो आज महान गोलंदाजांच्या पंगतीत जाऊन बसला. रविचंद्रन आश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापूर्वी देशांतर्गत क्रिकेट ही गाजवून सोडले होते. त्याने रणजी सामन्यात सातत्याने बळी मिळवले मात्र त्याला खरी ओळख मिळवून दिली ती आयपीएलने. आयपीएलमध्ये आश्विनने चेन्नई सुपर किंग्जचे प्रतिनिधीत्व केले. मुथय्या मुरलीधरन हा चेन्नई सुपर किंग्जचा प्रमुख गोलंदाज होता. कर्णधार महेंद्रसिंग धोनीला गोलंदाजीची सुरुवात फिरकीने करायची होती मात्र मुरलीधरन सुरुवातीलाच गोलंदाजी करण्यास तयार नसल्याने धोनीने चेंडू आश्विनकडे सोपविला. आश्विनने संधीचे सोने करीत प्रतिस्पर्धी संघाची सलामीची फळी कापून काढण्याची कामगिरी केली आणि तिथेच धोनीचा आश्विनवर विश्वास बसला. जगातील एक सर्वोत्तम हुशार फिरकी गोलंदाज म्हणून त्याने अल्पावधीतच ख्याती मिळवली. कारण चेंडू बोटांनी, मनगटांनी वळत असला, तरी आधी डोक्यात तो समोरच्या फलंदाजाला कसा टाकायचा याचे चित्र तो आधीच तयार करून ठेवायचा म्हणूनच त्याच्या चेंडूचा सामना करताना भल्या भल्या फलंदाजांची भंभेरी उडायची. तो आपल्या गोलंदाजीत सतत नवनवीन प्रयोग करायचा. आर्म बॉल, कॅरम बॉलचा तो खुबीने वापर करायचा. निवृत्ती नंतर रविचंद्रन आश्विनने त्याची ऑफ स्पिनची कला तरुण, युवा होतकरू खेळाडूंना शिकवावी आणि त्याच्यासारखे खेळाडू त्याने देशाला निर्माण करून द्यावेत हीच त्याच्याकडून क्रिकेट रसिकांची अपेक्षा आहे रविचंद्रन आश्विनला निवृत्ती नंतरच्या आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

## लग्नाच्या ६ दिवसानंतर कामावर परतली कीर्ती सुरेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** साऊथ ब्युटी कीर्ती सुरेशने काही दिवसांपूर्वी तिचा बॉयफ्रेंड अँटोनी थट्टिलशी लग्न केलं. लग्न झाल्यापासून कीर्ती सतत प्रकाश झोतात आहे. लग्नाच्या ६ दिवसानंतर ती आता कामावर परतली आहे. तिचा नवा व्हिडीओ समोर आलाय ज्यामध्ये ती मस्त तिचं मंगलसूत्र फ्लॉन्ट करताना दिसली.

'बेबी जॉन' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारी कीर्ती सुरेश आता नव वधू बनली आहे. अवघ्या ६ दिवसांपूर्वी म्हणजेच १२ डिसेंबरला तिने गोव्यात तिचा बॉयफ्रेंड अँटोनी थट्टिलशी लग्न केलं. लग्नाचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर धुमाकूळ घालताना पहायला मिळाली. अभिनेत्री लवकरच हनिमूनला जाईल अशी चाहत्यांना आशा होती. पण लग्नानंतर लवकरच कीर्तीही कामावर परतली आहे. ती वरुण धवनसोबत 'बेबी जॉन' या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये स्टारकास्टहीत सहभागी झाली आहे.

'पुष्पा २' रिलीज झाल्यानंतर आता चाहते 'बेबी जॉन'ची वाट पाहत आहेत. या चित्रपटाचा टीझर उत्कंठावर्धक आहे, जो पाहिल्यानंतर हा चित्रपट 'पुष्पाभाऊ'ला टक्कर देऊ शकतो असं चाहते म्हणत आहेत. कालच चित्रपटाच्या प्रमोशनसाठी स्टारकास्ट पोहोचली, पण लोकांच्या नजरा कीर्ती सुरेशवर खिळल्या होत्या. कार्यक्रमादरम्यान नवविवाहित वधू म्हणजेच कीर्ती सुरेश वेस्टर्न लूकमध्ये दिसली. तिने लाल रंगाचा ड्रेस घातला होता, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत होती. मात्र, कपाळावर सिंदूर किंवा बांगड्याची बिंदी नाही. मात्र त्याच्या गळ्यातील मंगळसूत्र लोकांच्या नजरेस पडलं. पारंपारिक तमिळ ब्राह्मण विवाहानंतर कीर्ती आणि अँटोनी यांनी ख्रिश्र्चन रितीरिवाजानुसार लग्न केलं. लग्नानंतर कीर्तीने तिच्या लग्नाची सुंदर छायाचित्रे चाहत्यांसोबत शेअर केली, ज्यावर चाहत्यांनी भरभरून प्रेमाचा वर्षाव केला.

## मुंबईतील मनोरा आमदार निवास इमारतीच्या कामाला गती देऊन जानेवारी २०२७ पर्यंत बांधकाम पूर्ण करण्याचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :** विधिमंडळ अधिवेशनासह मंत्रालयातील विविध कामांसाठी मुंबईत येणाऱ्या आमदारांसाठी निवासाची व्यवस्था होण्याकरिता उभारण्यात येत असलेल्या मनोरा आमदार निवास इमारतीच्या बांधकामाला गती देऊन ते जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी उच्चाधिकार समितीच्या बैठकीत दिले.

मुंबई येथील मनोरा आमदार निवास प्रस्तावित पुनर्विकास प्रकल्पाचा आढावा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.













DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### सुसाट वेगात असलेल्या थार गाडीचा दुभाजकाला धडक होऊन अपघात



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** पंचायत समिती समोर सुसाट वेगाने धावणाऱ्या थार गाडीचा दुभाजकाला धडकून अपघात झाला आहे. चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्यामुळे हा अपघात झाला. गाडी धडकल्यावर मोठा आवाज आल्या नंतर तिथे असलेल्या नागरिकांनी लगेच धाव घेतली. गाडी चालकाला गाडीतून बाहेर काढत गाडी अडकलेली गाडी क्रेनच्या साहाय्याने बाजूला काढली. सुदैवाने यात चालकाला कोणतीही दुखापत झाली नाही व त्यानंतर चालक स्वत: गाडी चालवत घेऊन गेला.

### विनोद तावडे यांनी मनोभावे घेतले साईंचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी श्री साईबाबा समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानचे वतीने प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी प्र.उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीपकुमार भोसले, प्रशासकिय अधिकारी प्रज्ञा महांडुळे-सिनारे, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी मदिर विभाग पर्यवेक्षक राजेंद्र पवार आदीउपस्थितहोते.

### ठाण्यात शिवसेना ठाकरे गटाकडून केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या वक्तव्याचा निषेध



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याचा राज्यभरातून निषेध केला जात आहे. ठाण्यात देखील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने अमित शाहांच्या वक्तव्याचा विरोध करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने केली. माजी खासदार राजन विचारे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. ज्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला दिशा दिली त्याच महामानवाचा अमित शाहांनी संसदेत अपमान केला त्यामुळे त्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी माजी खासदार राजन विचारे यांनी केली आहे.

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या वक्तव्यावरुन एमआयएम आक्रमक




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल वक्तव्य केल्यानंतर देशभरात याचे पडसाद उमटताना पहायला मिळत आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वात एमआयएम देखील आक्रमक झाली आहे. शहरातील पैठणगेट येथे गाढवावर अमित शाह यांचा फोटो लावून चपलांचा हार घालण्यात आला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

### सीएनजी, एलपीजी टँकरची समोरासमोर धडक; अनेकांचा मृत्यू

जयपूर : राजस्थानची राजधानी असलेल्या जयपूरमध्ये आज (२० डिसेंबर रोजी) सकाळी एक भीषण अपघात घडला. येथे एका एलपीजी आणि सीएनजी ट्रकची धडक झाली. हा अपघात एवढा भीषण होता की यामध्ये पाच जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेमध्ये ४० हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर जयपूरमधील सवाई मानसिंह हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले

# बालविवाह होऊच नयेत, यासाठी मुला-मुलींच्या समुपदेशनावर भर द्या - राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर

**- सर्व खासगी आस्थापनांनी युध्दपातळीवर अंतर्गत तक्रार समित्या स्थापन कराव्यात - अवैधरित्या होणारे गर्भपात रोखण्यासाठी सोनोग्राफी सेंटरच्या तपासण्या करा**

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षण व आरोग्यावर परिणाम होतो. यासाठी बालविवाह होऊच नयेत, म्हणून शाळा, महाविद्यायांमध्ये मुलामुलींच्या समुपदेशनावर भर द्या, असे निर्देश देऊन अवैधरित्या होणारे गर्भपात रोखण्यासाठी सोनोग्राफी सेंटरच्या नियमित तपासण्या करा, अशा सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन सभागृहामध्ये श्रीमती चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली, यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीला प्रभारी जिल्हाधिकारी संजय शिंदे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, इचलकरंजी महानगरपालिकेचे आयुक्त ओमप्रकाश दिवटे, कोल्हापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक जयश्री देसाई, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुहास वाईंगडे, जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिल्पा पाटील, आयोगाचे जिल्हा समन्वयक आनंद शिंदे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी महिला आयोग




आपल्या दारी उपक्रमांतर्गत झालेल्या सुनावणीत राज्यात सर्वाधिक २६ केसेस सामोपचाराने मिटल्याबद्दल आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, महिला व बाल विकास विभाग, विधी व प्राधिकरण तसेच जिल्हा परिषदेचे कौतुक केले.

श्रीमती चाकणकर म्हणाल्या, शासकीय व निमशासकीय आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समित्या स्थापन झाल्या आहेत. तथापि खासगी आस्थापनांत महिलांना कामाच्या ठिकाणी त्रास होवू नये, यासाठी अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार समित्या स्थापन झालेल्या नाहीत, अशा आस्थापनांनी युध्दपातळीवर अशा समित्या स्थापन कराव्यात. तसेच या समित्या स्थापन झाल्याची खात्री करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने धाडसत्र अवलंबावे व अशा आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

त्या म्हणाल्या, कौटुंबिक हिंसाचार, अंतर्गत कलह तसेच अन्य बाबींमुळे कुटुंब व्यवस्थेचे विघटन होत आहे. कुटुंब व्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागाने भरोसा सेलच्या माध्यमातून समुपदेशनावर भर द्यावा. समाजात बलात्कारासारख्या घटनांचे प्रमाण वाढत असून त्या रोखण्यासाठी समाजाची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न करा. मिशन वात्सल्य योजनेतून लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्या. जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असून बालविवाह रोखण्यासाठी शिक्षण, आरोग्य, पोलीस विभागाने मुलामुलींच्या समुपदेशनावर भर द्यावा. तसेच प्रिंटींग प्रेस, मंदिरे, समाज मंदिरांमध्ये प्रभावी उपाययोजना राबवा. ऊसतोड महिला कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करा. अवैधरित्या होणारे गर्भपात रोखण्यासाठी जिल्ह्यातील सोनोग्राफी सेंटरची नियमीत तपासणी करा, यासाठी आरोग्य विभागाने वेळोवेळी धाडसत्राची मोहिम राबवावी. सिड हल्लूयातील महिलांना मनोधैर्य योजनेतून लाभ द्या, असे सांगून त्या म्हणाल्या, सीमा भागात मोठ्या प्रमाणात मिसिंग केसेस आढळत आहेत. अशा घटना रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवा. सोशल मीडियाव्दारे मुलींची व महिलांची फसवणूक होऊ नये म्हणून समुपदेशन केंद्राच्या माध्यमातून शाळा, कॉलेज मधील मुलींचे त्याचबरोबर कौटुंबिक हिंसाचार होणाऱ्या महिला, मुलींच्या समुपेदशनावर भर द्या. निर्भया पथकाच्या माध्यमातून शाळा, कॉलेजच्या मुलींना संरक्षण द्या, बसस्थानकांवरील महिलांच्या स्वच्छतागृहाबाहेर महिला कामगारच असल्याची खात्री करा, तसेच सर्व शाळांमध्ये असणाऱ्या स्वच्छता गृहांमध्ये पुरेशा पाण्याची सोय करा. तसेच सखी वन स्टॉप सेंटरसाठी तात्काळ म्बुंलन्स उपलब्ध करुन देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

यावेळी सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी आपापल्या विभागांशी संबंधित माहिती दिली.

### ग्रामीण संस्कृतीचे प्रतीक असणारी बहुप्रतिक्षित भीमथडी जत्रा आजपासून सुरु

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणेकरांना आजपासून ग्रामीण संस्कृती, खाद्यमेजवानी, बचत गटांची उत्पादने खरेदी करण्याची मोठी संधी मिळणार आहे. आज पासून बहुप्रतीक्षित भिमथडी जत्रा सुरू झालीये आहे. पुण्यातील बहुप्रतीक्षित भिमथडी जत्रेला आजपासून सुरुवात होत आहे. भिमथडी जत्रेत ग्रामीण जीवनशैली, खाद्यसंस्कृतीचा आनंद पुणेकरांना घेता येणार आहे. ग्रामीण जीवनाचे हे प्रदर्शन आज पासून सिंचन नगर येथील कॉलेज ऑफ ग्रिकल्चर ग्राउंडवर आयोजित करण्यात आली आहे. २५ डिसेंबर पर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे. ग्रामीण कारागीर व उद्योजकांना शहरी प्रेक्षकांशी जोडण्याची परंपरा कायम ठेवत ही जत्रा सगळ्यांचे स्वागत करायला सज्ज झाली आहे. सकाळी १० ते रात्री १० दरम्यान, हे प्रदर्शन सुरू राहणार असून पुणेकरांना ग्रामीण कारागिरी व नाविन्यपूर्णतेचा अनुभव घेण्याची अनोखी संधी या प्रदर्शनात मिळणार आहे



## सभागृहात मुख्यमंत्र्यांनी दिलेले निवेदन आणि प्रत्यक्षात घडलेला घटनाक्रम यामध्ये तफावत आहे- सुषमा अंधारे

दैनिक आपला विदर्भ

**पभणी/प्रतिनिधी :** मोंढा पोलीस स्टेशनच्या तीन पोलीस अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होण्याची मागणी केली होती- आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गोरबांड यांचे निलंबन जाहीर केले आहे मात्र दोन अधिकारी अजूनही शाबूत आहेत यासंदर्भात आयजींशी बोलले .एकीकडे तुम्ही म्हणता की सोमनाथ सूर्यवंशीला श्र्वसनाचा आजार होता परंतु त्याची आई सांगते की असा कोणताही आजार नव्हता. सोमनाथ सूर्यवंशी याला श्वसनाचा त्रास होत होता तर त्याच्या आईला किंवा परिवाराला अगोदर का सांगितले नाही ?- परभणीत झालेल्या दंगलीला पोलिसांचा गलथानपणा व नाकर्ते पणा कारणीभूत आहे.काही निष्पाप लोकांवरही गुन्हे दाखल झाले आहेत



त्यावर काही तोडगा काढावा.शरद नरे आणि तुरनर या दोन पोलिसांवर हे दोन लोकांवर आयजी काहीही बोलले नाही- मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिलेली माहिती आणि प्रत्यक्षात घडलेली घटना यामध्ये प्रचंड तफावत आहे.मराठवाड्यातल्या सर्व घटनांवर मुख्यमंत्री बोलले पण ठोस कृती काय केली यावर ते काहीच बोलले नाहीत- दोन-तीन दिवसात स्वतः मुख्यमंत्र्यांना भेटणार आहे आणि त्यानंतर या आंदोलनाची दिशा आम्ही ठरवणार आहोत कुठल्याही जीवाची किंमत होत नाही तो अनमोल आहे, १० लाख रुपये हा त्यामागचा उपाय नाही - परभणीसारख्या अतिसंवेदनशील भागात ॲडीशनल एसपीच काम का करतात ? पण यावर बोलण्यासाठी गृहखाते अस्तित्वात असलं पाहिजे सुषमा अंधारे, शिवसेना ठाकरेगटाच्या उपनेत्या

## विरोधकांना पुढील पाच वर्षे आता त्यांना केवळ विरोध करणे इतकंच काम आहे- रुपाली चाकणकर

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** खातेवाटप करताना संख्या मोठी आहे, सर्वही योग्य होईल; अशी बातमी देखील समोर येईल.सहजासहजी नाही तर




मोठ्या कष्टाने निवडून येतात त्यामुळे कार्यकर्ते नाराज होतात.विरोधकांनी आत्मपरीक्षण करून जनतेनं दिलेला कौल विरोधकांनी मान्य करायला पाहिजे.विरोधकांना पुढील पाच वर्षे आता त्यांना केवळ विरोध करणे इतकंच काम आहे. विधानपरिषद माझा विषय नाही, पक्षाने पुन्हा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड केलीय.प्रत्येक पक्ष आपला आपला विचार घेऊन असतात.कोणत्या बौद्धिकतेला जायचं हा त्या त्या पक्षाचा निर्णय असतो. विरोधक प्रयत्न करतायत की, महायुतीत काहीतरी होईल, पण असं काही होणार नाही. महायुती किंवा राष्ट्रवादी काँग्रेस सीमाभागातील मराठी बांधवांच्या पाठीशी कायम आहोत. मी स्वतः समीर भुजबळ यांच्या संपर्कात आहे. अजित पवार यांच्या विरोधातील आंदोलनाचा निषेध करते.राज्याचे प्रांताध्यक्ष छगन भुजबळ यांच्या संपर्कात आहेत रुपाली चाकणकर, अध्यक्षा, राज्य महिला आयोग पत्रकार परिषद मध्ये म्हटले आहे

# वृद्धाला अटकेची भीती दाखवून ८.६५ लाखांची फसवणूक; यूपीतून दोघांना अटक

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** तुमच्या विरुद्ध मनीलॉन्ड्रीगचागुन्हा दाखल झाला आहे मी क्राईम ब्रांच अधिकारीबोलतो आहे. जर तुम्ही घराबाहेर पडलात तर तुम्हाला अटक केली जाईल व ही अटक तुम्हाला टाळायची असेल तर आम्ही सांगतो तसं करा असे सांगून वागळे इस्टेट येथे वास्तव्यास असणाऱ्या सदानंद रामचंद्र पाध्ये (८६) या वयोवृद्ध व्यक्तीची फसवणूक करण्यात आली आहे. या व्यक्तीला त्यांच्या बँक खात्यातून ८ लाख ६५ हजार १५३ रुपये आर.टी.जी.एस करण्यास सांगितले. त्यांनी रक्कम आर.टी.जी.एस केली. या व्यक्तीचे नातेवाईक फिर्यादी सोनाली घाट (५०) यांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. सदर फसवणुकीबाबत वागळे इस्टेट पोलीस






ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात कोणतीही माहिती नसताना पोलिसांनी तांत्रिक विश्र्लेषणाच्या आधारे गुन्हा उघडकीस आणला आहे. सायबर गुन्हेगार हे युपीमध्ये असल्याची माहिती मिळाल्यानंतर वागळे पोलिसांनी सूत्र हलवीतउत्तरप्रदेशमधीलरौचक अजयकुमार श्रीवास्तव (२९) रा.७४/बी, रुक्मीणी विहार, छटे मिल, बक्षी का तालाब, लखनौ, उत्तरप्रदेशआणि संदिप कमलेशसिंग यादव (२६) रा.खुटेहना, हरदोई ग्रामीण, उत्तरप्रदेशया दुकलीला ठाणे शहर पोलिसांनी १४ डिसेंबर २०२४ रोजी उत्तरप्रदेश मधून अटक केली. त्यांच्याकडून हस्तगत केलेल्या बँक खात्यांचा तपास केला असता त्यांनी आतापर्यंत५९ जणांची फसवणुक केल्याचे उघडकीस आले आहे. तसेच त्या फसवणुकीत मिळलेली रक्कमही क्रिप्टो करन्सी मध्ये परावर्तित केलेली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. जवळपास ४ हजार क्रिप्टो करन्सी (णडऊद्ध) अंदाजे ३ लाख २० हजार रुपये इतक्या रकमेचा शोध लागल्याचे पोलिसांनी सांगितले. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रविण सावंत करीत आहेत.

# ढाणकी नगरपंचायतचा अवास्तव संकल्प कर रद्द करा

## ढाणकी शहर काँग्रेस कमिटी मुख्याधिकारी यांच्याकडे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाल्यास नागरिकांवर करवाढीचा बोजा लादेल हे नागरिकांना माहित असताना सुद्धा ढाणकी नागरिक यामुळे खुश होते की,आता आपल्या ढाणकी गावचे शहरीकरण होऊन आपल्या गावाचा विकास होईल, गावात कधी नव्हे स्त्री-पुरुष साठी संडास बाथरूम होईल, पाण्याची समस्या मार्गी लागून शुद्ध पाणी मिळेल, आरोग्य सुविधा मिळेल, नगरपंचायत झाल्यास करवाढ झाली तरी , त्याचे फायदेही मोठे मिळतील सरपंच चा मुख्याधिकारी दर्जाचा प्रथमश्रेणी अधिकारी मिळाल्याने विकासकामांना चालना मिळेल, घरपट्टी, दिवाबत्ती कर वाढले तरी महसुलात वाढ होऊन शहरचा विकास होईल.पण हे सर्व काही ढाणकी गावाला लाभले नाही त्यांच्या पदरी फक्त सरपंच ठिकाणी मुख्याधिकारी दर्जाचा प्रथमश्रेणी अधिकारी आणि पुढील वर्षा साठी अतिरिक्त कर मिळाला. ढाणकी शहर काँग्रेस कमिटी आता नागरिकांवर लादणारा नवीन कर विरोधात पेटली असून त्यांनी नगरपंचायत ढाणकी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे की, नगरपंचायत ने आपल्या कार्यालया अंतर्गत सन २०२५/२०२६ च्या संकल्पामध्ये ढाणकी येथील नागरीकांच्या मालमत्तेतर २६%. इत्तर कर लावलेले आाहेत शैक्षणिक कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर इत्यादी व वाढीव कर. सध्याच्या दुष्काळ सदृष्य परिस्थिती महागाई, बेरोजगारी, शेती पिक योग्य भाव मिळत नसतांना आपल्या नगरपंचायत कडून जाचक करांमुळे सामान्य नागरिकांचा आर्थीक बोजा वाढत आहे. आपल्या नगर पंचायत कार्यालयाकडून रहीवाश्यांना कोणत्याही मुलभूत सुविधा नसतांना कोणताही विकास झालेला नसून . पहील्यांदा नागरीकांना सुविधा देण्यात यावे. नगरपंचायत आंतर्गत कोणत्याच प्रकारचे शाळा, रोजगार हमीचे काम सुरु नसताना व गावात व रस्त्यावर कुठेही वृक्ष लागवड नसताना हे अतिरिक्त कर लावू नये, अन्यथा नाईलाजाणे लोकशाही मार्गाने



जनआंदोलन करून काही परिणाम झाल्यास ढाणकी नगरपंचायत कार्यलय जबाबदार राहील चा इशारा दिला. निवेदन देताना, बाळासाहेब चंद्रे, अमोल तुपेकर, बाबुराव नरवाडे, रमेश गायकवाड, रुपेश भंडारी गजानन मिटकरे, अक्षय रमेश भगत, शुभम मुनेश्र्वर, नामदेव गोपेवाड, साहेबराव वाघमोडे, सुधाकर बाबुळकर आणि ढाणकी नगरपंचायतचे नागरिक उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### वर्ध्यामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या वक्तव्याविरोधात काँग्रेसचे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत क्रेंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी केलेल्या वक्तव्याचा राज्यभरात निषेध केला जात आहे. ठिकठिकाणी शाह यांच्या वक्तव्या विरोधात निदर्शने, आंदोलने केली जात आहेत. आज वर्ध्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात काँग्रेसच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली तसेच जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

### बुधवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा रूग्णालयात नियमितपणे बुधवारी दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र बुधवार, दि. २५ डिसेंबर २०२४ रोजी ख्रिसमस निमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे. ०

### मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ‘देश का प्रकृती परीक्षण’ अभियान संपन्न; प्रशिक्षनार्थ्यांचा उत्स्फुत प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार शुक्रवार दि. २० डिसेंबर रोजी ए.एस.पी.एम. आयुर्वेद महाविद्यालय रुग्णालय व अनुसंघान संस्था यांच्या वतीने देश का प्रकृती परीक्षण अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानांतर्गत संस्थेतील सर्व प्रशिक्षणार्थी, अधिकारी व कर्मचारी यांचे आयुष मंत्रालयाच्या मोबाईल पव्दारे स्वास्थ परीक्षण करण्यात आले. यावेळी कर्मचारी व प्रशिक्षणार्थ्यांनी उत्सर्फुत प्रतिसाद दिला. सदर अभियान यशस्वीपणे पार पडण्यासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोताळा जि. बुलढाणा संस्थेचे प्राचार्य एस.डी. गंगावणे व सर्व कर्मचारी व प्राचार्य डॉ. राजेश्र्वर उबरहंडे, एस.पी एम. आयुर्वेद महाविद्यालय रुग्णालय व अनुसंधान संस्था बुलढाणा व त्यांचे स्वयंसेवक यांनी परीश्रम घेतले.

### डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त अकोला येथे कृषी प्रदर्शनी; २७ ते २९ डिसेंबर दरम्यान प्रदर्शनी शेतकरी बांधवांनी लाभ घेण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, कृषी विभाग , महाराष्ट्र शासन व आत्मा अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने अँग्रोटेक-२०२४ या राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनीचे आयोजन,दि. २७ ते २९ डिसेंबर २०२४ दरम्यान क्रीडांगण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी नगर, अकोला येथे करण्यात आले आहे. राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनीच्या निमित्ताने कृषी तंत्रज्ञानाचा जागर होत असून शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या तीन दिवशीय अँग्रोटेक-२०२४ राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे यांनी केले आहे. या राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनीचे वैशिष्ट्ये : कृषी विद्यापीठ व संलग्न कृषी संस्थांची दालने, विद्यापीठ शास्त्रज्ञांसोबत विविध विषयांवर दररोज चर्चासत्र, कृषी अवजारे व उत्पादनांची दालने, कृषी व कृषी संलग्नित योजनांची माहिती, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाची दालने, मत्स्यव्यवसाय विभागाची दालने, कृषी व ग्रामीण उद्योग दालने, फुले,फळे व भाजीपाला प्रदर्शन, बचत गटांचा सहभा, विद्यापीठ प्रकाशनाचे दालन राहणार आहे.

### प्रवासी बोटीच्या अपघाताबाबत विधानपरिषदेत निवेदन

**नागपूर/प्रतिनिधी :** मुंबई शहराजवळ अरबी समुद्रातील बुचर आयलँडनजिक नीलकमल कंपनीच्या एका प्रवासी बोटीला नौदलाच्या बोटीने धडक दिल्याची घटना १८ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३.५५ च्या सुमारास घडली. या बोटीतील एकूण ११० प्रवाशांपैकी ९६ प्रवाशांना सुरक्षित वाचविण्यात आले असून अद्याप शोधकार्य सुरू असल्याची माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत निवेदनाद्वारे दिली.

मुंबईतील बोट दुर्घटनेप्रकरणी विधानपरिषदेत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की, नौदलाचे व्हाईस अ‍ॅडमिरल संजय जगजित सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, नौदलाच्या डॉक्टरांनी आतापर्यंत १३ जणांना मृत घोषित केले आहे. आतापर्यतच्या माहितीनुसार मृतामध्ये नौदलाचे ३ तर १० नागरिक आहेत. ३ गंभीर जखमींना नौदल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यात एक ४ वर्षाची मुलगी व एक ८ महिन्यांची गरोदर महिला आहे. दोघांची प्रकृती स्थिर आहे.

# गरजूपर्यंत जलद आणि सुरक्षितपणे योजना पोचविण्याचे काम केंद्र सरकारच्या माध्यमातून केल्या जात आहे : केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** नवभारत निर्मितीच्या दृष्टिकोनातून आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून केंद्र सरकारच्यावतीने गरजूपर्यंत जलद आणि सुरक्षितपणे योजना पोचविण्याचे काम केल्या जात आहे अशी माहिती केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी माध्यमांशी बोलताना दिली

दिल्ली येथील निवासस्थानी केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे आज २० डिसेबर रोजी मध्यम प्रतिनिधीशी बोलत होते.ते पुढे म्हणाले की पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखालील JAM ट्रिनिटी, UPI आणि DBT या माध्यामातुन गरजुना जलद गतीने लाभ देण्याच काम केंद्र सरकारच्यावतीने सुरु आहे JAM ट्रिनिटी: जन धन योजना, आधार आणि मोबाईलच्या समन्वयातून दुर्बल घटकांना सशक्त करणारे यशस्वी पाऊल भारताने उचल आहे आतापर्यंत ५४.१९ कोटी बँक खाती उघडली गेली असून २.४ लाख कोटींची ठेव झाली आहे.

UPI: डिजिटल पेमेंटमध्ये जागतिक क्रांती झाली आहे फक्त नोव्हेंबर २०२४ मध्येच २१.५५ लाख कोटींचे व्यवहार झाले आहे DBT: च्या माध्यमातून भेट लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा होत असल्यामुळे पारदर्शकता वाढली आहे आतापर्यंत ४०.८१ लाख कोटी रुपये भेट लाभार्थ्यांच्या खात्यांमध्ये पाठविण्यात आले असून ३.५ लाख कोटींची बचत झाली आहे. अशी माहिती आहे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी माध्यम प्रतिनिधीशी बोलताना दिली

### अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत रिक्त असलेल्या जागा भरण्यात येणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांकडून १६ डिसेंबर पासून प्रत्यक्षरित्या व ऑनलाईन अर्ज मागविण्यात आली आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in यासंकेतस्थळावर याबाबत ताज्या घडामोडीमध्ये विस्तृत माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत मंगळवार ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत आहे.

नांदेड जिल्ह्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांनी आपले अर्ज आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय ३ चर्च पथ पुणे या कार्यालयात मुदतीत सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सन २०२४-२५ मध्ये राज्यातील अल्पसंख्याक समुदयातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यासाठी शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाने मंजुरी दिली आहे, असेही प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट केले आहे.

# लोणार येथे अवैध औषधसाठा जप्त

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासनाच्या मार्फत लोणार येथे अवैध औषधसाठा जप्त करण्यात आला आहे. सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासन कार्यालयातील औषध निरीक्षक गजानन प्रल्हाद घिरके यांना लोणार येथे अवैधपणे औषध साठवणूक केल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. त्या आधारे औषध निरीक्षक एम.व्ही. गोतमारे, अन्न व औषध प्रशासन, वाशिम यांच्या समवेत दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी मौजे लोणार येथे चंदन मेडीकोजचे मागे रुम क्रमांक १, बस स्टँड जवळ, लोणार येथे तपास चौकशी केली असता सदर जागेत विनापरवाना औषधी साठवणूक केल्याचे आढळून आल्याने, सुशिल पुनमचंद दरोगा हजर व्यक्ती यांच्याकडून नमूना १६ व पंचनामा अंतर्गत एकूण २४.३३ लक्ष चा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर साठयातून औषध नमूना विश्र्लेषणासाठी घेण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

चंदन मेडीकल स्टोअर्स, लोणार येथे तपासणीस्तव भेट दिली असता त्यांच्याकडे कामोत्तेजक औषधी (Vigrox-100) आढळून आल्याने रुपये ८ हजार २२५ रुपये चा साठा नमूना १५ दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी प्रतिबंधीत करण्यात आला आहे. झोपेच्या गोळया, गर्भपाताची औषधे तसेच नशा येणारी औषधे व सर्व लोपॅथीक औषधे त्यांनी कोणत्याही परीस्थितीत डॉक्टरांच्या चिठ्ठी शिवाय ग्राहकांना देवू नयेत, तसेच प्रत्येक औषधाचे औषध विक्री बिल ग्राहकांना देण्यात यावे अशा प्रकारचे उल्लघंन केल्याचे आढळून आल्यास औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्या अंतर्गत नियमांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल. असा इशारा जिल्हयातील सर्व मेडीकलधारकांना देण्यात आला आहे.

बुलढाणा जिल्हयातील नागरीकांनी कुठलीही लोपॅथीक औषधे विना प्रिस्कीपशन डॉक्टरांच्या सल्लयाशिवाय घेऊ नयेत. स्वत:च्या मनाने औषधे घेतल्याने शरीरावर दुष्परीणाम होतात असे आवाहन सहायक आयुक्त (औषधे) गजानन प्रल्हाद घिरके, अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा यांनी केले आहे.

# किनगाव जट्टू येथील शेतकऱ्याच्या शेतातील उभे तुरीचे पीक अज्ञात चोरट्यानी कापुन नेले

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** बीबी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या किनगाव जट्टू येथील शेतकऱ्याची जमीन वसंत नगर शिवारात असून त्या शेतातून अज्ञात व्यक्तीने उभ्या तुरीचे झाडे कापून नेल्याची घटना दिनांक २० डिसेंबरला उघडकीस आली आहे किनगाव जट्टू येथील शेतकरी काशिनाथ राऊत यांची जमीन वसंत नगर शिवारात गट नंबर ३९ मध्ये चार एकर बारा गुंठे असून एका हेक्टर मध्ये सोयाबीन पेरलेले होते व त्यामध्ये तुरीचे पिकाचे पाटे पेरलेले होते सोयाबीन सोंगणी केल्यानंतर तुरीच्या झाडाला खत व पाणी दिल्यामुळे तूर चांगल्या प्रकारे आली होती दरम्यान दिनांक १९ तारखेला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने शेतामधील काही तुरीचे झाडे कुणीतरी अज्ञात व्यक्तीने कापून नेल्याने जवळपास आठ हजार रुपयाचे नुकसान केले असल्याने नुकसानी संदर्भात बिबि पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून अज्ञात व्यक्ती विरोधात ३२४ कंसात दोन नुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे पुढील तपास बीबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ए एस आय परमेश्र्वर शिंदे करीत आहे.



# सिंदखेडराजा तालुक्यात प्रशासन गाँव की ओर मोहीमेंतर्गत लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्राचे वाटप

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर दरम्यान सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहेत.

या सप्ताहांतर्गत जिल्ह्यात ‘प्रशासन गाँव की ओर’ मोहीमेचा दुसऱ्या दिवशी दि. २० डिसेंबर रोजी सिंदखेड राजा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी तसेच तालुक्यातील इतर कार्यालय प्रमुखांच्या हस्ते ई- शिधापत्रिका, जातीचे दाखले व विविध प्रमाणपत्रांचे







वाटप करण्यात आले. तसेच यावेळी संबंधितांनी लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनाची माहिती दिली.

या ‘सुशासन सप्ताह-प्रशासन गाँव की ओर’ मोहिमेंतर्गत प्रशासनातील विविध विभागांच्या सेवांचा लाभ नागरिकांपर्यत पोहचविण्यासाठी गावपातळीवर शिबिरांचे आयोजन करुन विविध सेवांचा लाभ दिला जाणार आहे. तसेच लाभार्थ्यांच्या तक्रारीं, अर्जांचा निपटारा करुन सेवांचा लाभ दिला जाणार आहे.